# समाजभूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २

**प्रथम सत्रांत परीक्षा २०१५-१६**

**विषय – मराठी (आधुनिक मराठी वाङ्मय)**

**पाठ्यपुस्तक – नट सम्राट (S1)**

**द्वितीय वर्ष – कला** **वेळ : २ तास**

**गुण ६०**

---

**सूचना –** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. २) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा.** **१५**

१) 'नाटक' या वाङ्मय प्रकाराचा थोडक्यात परिचय करून द्या.
२) 'नाटक' या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.
३) मराठी संगीत रंगभूमीचा थोडक्यात परिचय करून द्या.
४) नाटकाचे घटक सविस्तर सांगा.
५) मराठीतील कोणत्याही पाच नाटककारांची नावे लिहा.

**प्र.२ खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे २० शब्दात लिहा.** **१०**

१) 'नाट्यशास्त्र' या ग्रंथाचे कर्ते कोण ते लिहा?
२) मराठी रंगभूमीचे 'भीष्माचार्य' कोणास म्हटले जाते?
३) कोणत्याही दोन संगीत नाटकांची नावे लिहा.
४) 'संगीत सौभद्र' या नाटकाचे कर्ते कोण ते लिहा.
५) तुम्हास आवडलेल्या दोन नाटकांची नावे लिहा.
६) 'नटसम्राट' या नाटकात प्रमुख भूमिका कोणाची आहे?
७) अप्पासाहेब बेलवलकर यांनी कावेरीला कोणती भेट दिली?
८) राजा मुंबईत कोणते काम करतो?
९) अप्पा सुहासला कोणत्या नावाने हाक मारतात?
१०) अप्पासाहेब बेलवलकरांना पुरस्काराच्या थैलीत किती पैसे मिळतात?

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा.** **१५**

१) 'नटसम्राट' मधील स्वगताचे महत्त्व लिहा.
२) 'नटसम्राट' मधील नलिनी कळवणकराचे व्यक्तिचित्र रेखाटा.
३) 'नटसम्राट' मधील रेल्वेस्टेशनवरील प्रसंगाचे वर्णन करा.
४) अप्पासाहेब बेलवलकरांनी सुहासला कोणता संदेश दिला आहे.
५) 'नटसम्राट' मधील राजाचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**प्र.४ खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ३०० शब्दात लिहा.** **२०**

'नटसम्राट' मधील अप्पासाहेब बेलवलकरांचे व्यक्तीचित्र रेखाटा.

किंवा

एक कलात्मक नाट्यकृती म्हणून 'नटसम्राट' या नाटकाचा परामर्श घ्या.

***